# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेसनोट क्रमांक ३१५/२०२४** **दिनांक- १९/०८/२०२४.**

## "दोन महिला वेश्यादलालास ताब्यात घेवुन चार पिडीत महीलांची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा पथकास यश"

दिनांक १७/०८/२०२४ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना बातमीदारांकडुन महिला नामे १) निर्मला विजय राजपुत २) उषा राजेंद्र कंळबे या दोघी वेश्याव्यवसाय करीत असुन त्यांचे मोबाईल क्रमांकावर पुरुष गिऱ्हाईकाने संपर्क साधला की, व्हाटसअॅपव्दारे पुरुष गिऱ्हाईकाना फोटो पाठवुन, पैशाच्या मोबदल्यात वेश्यागमनासाठी गिऱ्हाईकांना मुली पुरवितात.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक व दोन पंच बोलावुन वेश्यादलाल निर्मला व उषा यांनी सांगितल्याप्रमाणे रु.नं.३१० जिनेश्वर विहार बिल्डिंग नं.३,सी विंग तिसरा माळा,मुलजीभाई मेहता शाळेजवळ गोकुळ टाउनशिप विरार प.ता.वसई जि.पालघर या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन १४.०४ वा. छापा टाकला असता,यातील महिला वेश्यादलाल नामे १) निर्मला विजय राजपुत वय ५५ वर्षे रा. रुम नं.३१० जिनेश्वर विहार बिल्डिंग नं.३, सी विंग तिसरा माळा, मुलजीभाई मेहता शाळेजवळ गोकुळ टाउनशिप,विरार पश्चिम ता.वसई,जि.पालघर, मुळ रा.कामनहरी सर्कल, मेजेस्टीक,बँगलोर २) उषा राजेंद्र कंळबे वय ४२ वर्षे रा. साई बोईत अपार्टमेंट, गुरुदत्त नगर, विरार पुर्व ता.वसई जि.पालघर, मुळ रा.गाव उमरठे, पोलादपुर जि.रायगड यांनी आपसात संगणमत करुन ०४ पिडीत मुलींना आणुन वेश्यागनमासाठी प्रवृत्त करुन वेश्यागमनाची रक्कम ठरवुन स्वत:च्या उपजिवीकेकरीता रक्कम वेश्यादलाल निर्मला हिने स्वीकारल्याने त्यांना सापळयातील रोख रक्कम ३०००/- ताब्यात घेवुन ०४ पिडित मुलींची सुटका केली आहे. सदर बाबत ताब्यातील महिला वेश्यादलाल १) निर्मला विजय राजपुत २) उषा राजेंद्र कंळबे यांच्याविरुध्द सफौ/उमेश गवई यांनी सरकार तर्फे फिर्यादी दिल्याने अर्नाळा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र. I २६५/२०२४, भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १४३(२), सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे दिनांक १७/०८/२०२४ रोजी गुन्हा दाखल आहे

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री मदन बल्लाळ, सहायक पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/सौरभी पवार व सफौ/गवई, मपोहवा/डोईफोडे, पोहवा/शेटये, किणी, मपोशि/पाटील व चालक पोहवा/पागी सर्व नेम.अनै.मा.वा.प्र.कक्ष नालासोपारा यांनी उत्कृष्ठरित्या पार पाडली आहे.

**----------0000---------**